**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक: 25.08.2024** **वार: रविवार**

---

**ठळक बातम्या**

- एकीकृत पेन्शन योजनेला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
- जळगाव इथं लखपती दीदी संमेलनात पंतप्रधान आज संवाद साधणार.
- नेपाळ बस दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २५ जणांचे पार्थिव देह नातेवाईकांच्या स्वाधीन. वारसांना आर्थिक मदत जाहीर.

आणि

- राज्यातल्या काही भागात पावसाचा पुन्हा जोर.

**रचनात्मक-पेन्शन**

केंद्रीय मंत्रिमंडळाने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी निश्चित पेन्शनची तरतूद करणाऱ्या एकीकृत पेन्शन योजनेला मंजुरी दिली आहे, मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, योजनेच्या पहिल्या भागात किमान 25 वर्षांच्या पात्र सेवेनंतर सेवानिवृत्त होण्यापूर्वी मागील बारा महिन्यांतील सरासरी मूळ वेतनाच्या 50 टक्के खात्री आहे. दुसऱ्या भागात कर्मचाऱ्याच्या निधनानंतर ६० टक्के पेन्शन कुटुंबाला मिळण्याची हमी आहे. वैष्णव म्हणाले की या योजनेचा सुमारे 23 लाख केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे. योजनेचं स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा गाडा चालविण्यात केंद्र सरकारी कर्मचारी देत असलेल्या योगदानाचं कौतुक केलं. तर 32 लाख कर्मचाऱ्यांचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या संयुक्त सल्लागार यंत्रणेच्या कर्मचारी शिष्टमंडळानं पंतप्रधानांची भेट घेऊन सरकारच्या निर्णयाची प्रशंसा केली.

**लखपती दीदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जळगाव इथं लखपती दीदी संमेलनात सहभागी होण्यासाठी येणार आहेत. या कार्यक्रमात ११ लाख लखपती दीदींना प्रमाणपत्रं प्रदान करण्यात येतील. या योजनेमुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळणार असून बचत गटांसोबत काम करणाऱ्या लक्षावधी महिलांना लाभ देण्यासाठी २ हजार ५ शे कोटी रुपयांचा निधी दिला जाणार असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. यावेळी मोदी बचत गटाच्या महिलांशी संवाद साधणार आहेत त्यात त्यांना मिळणाऱ्या योजनांचा लाभ आणि इतर काही महिलांच्या कल्पना ते जाणून घेणार असल्याची माहिती माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

**नेपाळ अपघात**

नेपाळ बस दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २५ जणांचे पार्थिव देह भारतीय वायुसेनेच्या विशेष विमानानं काल जळगाव इथं आणण्यात आले. रुग्णवाहिकेतून त्यांच्या मूळ गावी नेण्यात येऊन आवश्यक प्रक्रियेनंतर हे पार्थिव देह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की या अपघातात जखमी झालेल्यांवर नेपाळमध्येच रुग्णालयात उपचार सुरू असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून या अपघातातील प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपये सानुग्रह मदत स्वरूपात दिले जाणार आहेत.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११३ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. newsonair.gov.in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचं मराठी भाषांतर ऐकता येईल.

**बहीण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत खोडा घालण्याचा विरोधकांचा प्रयत्न हाणून पाडणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल यवतमाळ इथं मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या प्रचार प्रसारासाठी आयोजित वचनपूर्ती मेळाव्यात ते काल बोलत होते. महिलांची समाजात, कुटुंबात भागिदारी वाढविण्यासोबत त्यांचा 'सन्मान' वाढविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली असल्याचं सांगताना या योजनेसाठी आतापर्यंत एक कोटी 40 लाख महिलांनी नोंदणी केली. त्यापैकी 1 कोटी 7 लाख बहिणींच्या खात्यात आपण रक्कम देखील जमा केली आहे. राज्यातील शेवटच्या बहिणीचा अर्ज सादर होईपर्यंत नोंदणी सुरुच राहील असंही शिंदे यांनी यावेळी सांगितले.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...**

**साखर-अधिवेशन**

साखर कारखानदारी आणि ऊस उत्पादन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचं आव्हान असून त्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित करावं, असं आवाहन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल पुण्यात दी डेक्कन शुगर तंत्रज्ञ संघटनेच्या एकोणसत्तराव्या वार्षिक

अधिवेशन आणि प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी दूरस्थ पद्धतीनं केलं. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. देशातील साखर कारखाने आधुनिक करुन त्यांना दिशा देण्याच्या कामात साखर महासंघानं सिंहाचा वाटा उचलला असल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी सांगितलं.

**दूध**

ए-वन आणि ए-२ प्रकारचं दूध आणि दुधाची उत्पादनं यांच्या सर्व पाकिटांवरील सर्व दावे तत्काळ काढून टाकावेत असा आदेश भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरणानं दिला आहे. ऐकूयात याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***V/C***

*ए-वन आणि ए-टू प्रकारचं दूध आणि दुधाची उत्पादनं यांच्या सर्व पाकिटांवरील सर्व दावे तत्काळ काढून टाकावेत असा आदेश भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरणानं दिला आहे. अन्न व्यवसाय कंपन्या FSS AI च्या परवाना क्रमांकाखाली दुध आणि दुधाची उत्पादनं ए-वन आणि ए-२ वर्गीकरणात विकत असल्यामुळं हा आदेश देण्यात आला आहे. दुधाचं ए-वन आणि ए-टू वर्गीकरण प्रथिनाच्या संरचनेतील फरकाशी निगडीत आहे त्यामुळं ए-टू चे दुधातील चरबीबाबत कोणतेही दावे दिशाभूल करणारे आणि २००६ च्या कायद्यातील तरतुदींच्या विपरित असल्याचं प्राधिकरणानं स्पष्ट केलं आहे. FSS AI नं पुढं असंही सांगितलं की २०११ च्या अन्न सुरक्षितता आणि मानक नियमांमध्ये नमूद केल्यानुसार दुधासाठीच्या मानकांमध्ये, ए-वन आणि ए-टू प्रकारांवर आधारित दुधाचा कोणताही फरक केलेला नाही किंवा त्याला मान्यता नाही. त्यामुळं ए-वन आणि ए-टू प्रथिनांशी संबंधित सर्व दावे अन्न व्यवसाय कंपन्यांनी त्यांच्या वेबसाईट्सवरुन तत्काळ काढून टाकण्याचा आदेश FSS AI नं दिला आहे.*

*आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.*

**बैठक**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल मुंबईत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. यावेळी जागावाटपाबद्दल चर्चा झाली, मात्र जागा वाटप, कोणत्या पक्षाला किती जागा याबद्दल काहीही ठरलं नसल्याचं त्यांनी सांगितलं.

**सूर्यघर**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेत अकोला जिल्ह्यातील 858 घराच्या छतांवर सौर पॅनेलच्या माध्यमातून वीज निर्मिती सुरू झाली आहे. वापराएवढी वीजनिर्मिती होत असल्यानं त्यांचं वीज देयक शून्यापर्यंत कमी झाले आहे. या पर्यावरणपूरक योजनेचा जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केलं आहे.

**सौरप्रकल्प**

महानिर्मितीच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील साक्री इथंल्या शिवाजीनगर इथं उभारण्यात येत असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पापैकी २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा साक्री-१ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. याठिकाणी एकंदर ७० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचं काम हाती घेण्यात आलं असून यातून वार्षिक वीज निर्मिती ४५ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

**पाऊस पाणी**

राज्यातल्या काही भागात पावसाने पुन्हा जोर धरला आहे. धुळे जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून साक्री तालुक्यात पांझरा, जामखेडी, मालनगाव प्रकल्पातून पाण्याचा प्रवाह सतत वाढतच आहेत. तसेच निम्न पांझरा प्रकल्पातून पाणी सोडण्यात आल्याने पांझरा नदीपात्रासह इतर नदीनाल्यांना पूर आलेला आहे. दरम्यान अक्कलपाडा धरणातून पांझरा नदीत पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता असून नागरिकांनी खबरदारी घेण्याचं आवाहन पापळकर यांनी केलं आहे.

नाशिक शहर, तालुका तसेच इगतपुरी आणि त्रंबकेश्वर तालुक्यात जोरदार पावसामुळे गंगापूर आणि दारणा धरणातून पुन्हा एकदा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यात पाटोदा महसूल मंडळात आठ दिवसात दुसऱ्यांदा अतिवृष्टी झाली असून पाटोदा मंडळातील अनेक नद्यांना आले आहेत. मांजरा नदी दुधडी भरून वाहत असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. जिल्ह्यात वडवणी तालुक्यात सर्वात अधिक पाऊस झाला आहे. तर नांदेड जिल्ह्यात तीन तालुक्यातील आठ महसूल मंडळांमध्ये काल सकाळपर्यंत अतिवृष्टीची नोंद झालेली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात १२ ते १५ दिवसांनी दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ९९ टक्क्यांहून अधिक पावसाची नोंद झाली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात पावसाची संततधार सुरु आहे. कुडाळ इथं राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाने मुक्या प्राण्यांची पुराच्या पाण्यातून सुटका केली.

सांगली जिल्ह्यातदेखील मुसळधार पावसामुळे ओढे, नाले भरून वाहत आहेत. काही मार्गावर पाणी आल्यामुळ वाहतूक पर्यायी मार्गानं वळविण्यात आली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात पावसामुळं जलाशय पूर्ण भरले असून अनेक पूल पाण्याखाली गेले आहेत. पुण्यातही पावसाची संततधार असून खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे.

**हवामान**

जळगाव, धुळे, पुणे, सातारा, अहमदनगर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाच्या जोरदार सरी कोसळण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.